**ठळक बातम्या**

- अमली पदार्थमुक्त युवा ही मोहीम म्हणजे देशाच्या युवा वर्गाच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा सामूहिक संकल्प असल्याचं, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं 'मन की बात' मध्ये प्रतिपादन

- भारत आणि उझबेकिस्तान यांच्यातले संबंध 'सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी' च्या पातळीवर न्यायला दोन्ही देशांच्या नेत्यांची संमती

- सरसकट मराठा समाजाला कुणबी म्हणून घोषित करा, अशी मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांची मागणी, तर सर्व कायदेशीर मागण्यांवर चर्चा करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

आणि

- नेपाळमध्ये काठमांडू इथं अडकलेले नागपूरचे १०२ यात्रेकरू सुरक्षित परतले

<><><><><>

विकसित भारतासाठी देशभरात राबवली जात असलेली अमली पदार्थमुक्त युवा ही मोहीम हा, देशाच्या युवा वर्गाचं आरोग्य, आनंद आणि उज्ज्वल भविष्यासाठीचा सामूहिक संकल्प असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. त्यांनी आज आकाशवाणीवर 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. युवा पिढी आणि अमली पदार्थमुक्त भारत हे उद्दिष्ट आहे, असं ते म्हणाले. अमली पदार्थांविरोधात जनजागृती करणाऱ्यांचं आणि या व्यसनाशी झुंज देणाऱ्यांना मदत करणाऱ्यांचं त्यांनी कौतुक केलं. ही मोहीम प्रभावी ठरावी यासाठी देशातल्या आशय निर्मात्यांनी विविध भाषांमधल्या आशयाच्या माध्यमातून योगदान द्यावं, तसंच यासाठी नशामुक्त युवा हा हॅशटॅग वापरण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

देशभरात लाखो महिला विविध व्यवसाय करतात, मात्र भांडवलाच्या अभावामुळे त्यांच्या व्यवसायाची प्रगती होत नाही, ही बाब त्यांनी अधोरेखित केली. मात्र प्रधानमंत्री स्वनिधी योजनेमुळे आता अशा लाखो महिलांना नवं बळ मिळू लागल्याचं ते म्हणाले. या योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये महिलांचं प्रमाण जवळपास ४६ टक्के आहे, आणि देशभरातल्या

सुमारे ३५ लाख महिला या योजनेमुळे आपल्या व्यवसायाचा विस्तार करू लागल्या असल्याची माहिती त्यांनी दिली. याच अनुषंगानं देशभरातल्या विविध यशोगाथाही त्यांनी श्रोत्यांसमोर मांडल्या. हे महिला सक्षमीकरणाचं एक जिवंत उदाहरण असल्याचं ते म्हणाले.

***होल्ड बाईट - MKB MAHILA SAKSHAMIKARAN***

आज आपल्या मुलींची स्वप्न देखील अवकाशात झेप घेऊ लागल्याचं ते म्हणाले. याच अनुषंगानं भारत राबवत असलेल्या मिशन शक्तीसॅट या अभियानाविषयी त्यांनी सांगितलं. राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याला सुरुवात झाली असून, विद्यार्थिनींच्या सहभागानं तयार केलेला एक उपग्रह चंद्राच्या कक्षेत पाठवण्याची तयारी सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

प्रधानमंत्र्यांनी स्वच्छतेचं महत्त्वही श्रोत्यांना सांगितलं. जेव्हा लोक एखादं ठिकाण स्वच्छ ठेवण्याचा संकल्प करतात, तेव्हा स्वच्छतेसोबतच त्या जागेची संपूर्ण ओळखही बदलते, असं ते म्हणाले. आपली गावं, शहरं, नद्या किंवा तीर्थक्षेत्रांची ओळख आपल्या वागणुकीतून घडते, आणि जेव्हा त्याला स्वच्छतेची जोड मिळते तेव्हा त्या त्या ठिकाणाचं सौंदर्य अधिकच वाढतं असं प्रतिपादन त्यांनी केलं.

निसर्गाचं रक्षण केल्यामुळेच आपलं जगणं समृद्ध होऊ शकतं असा विचार मोदी यांनी श्रोत्यांसमोर मांडला. वनसंवर्धन आणि उपजीविकेचा समतोल साधणारी देशभरातली प्रेरक उदाहरणं त्यांनी श्रोत्यांसमोर मांडली आणि कृषी क्षेत्रात होत असलेल्या वेगवेगळ्या यशस्वी प्रयोगांविषयी देखील त्यांनी सांगितलं.

आपले सण आणि उत्सव, आपल्या परंपरांसोबतच, आपल्याला एकमेकांशी जोडले जाण्याची संधीही देतात, असं ते म्हणाले. आगामी सण-उत्सवांचा उल्लेख करत, त्यांनी स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी 'व्होकल फॉर लोकल' या मंत्राचा अंगिकार करण्याचं आवाहन केलं. भारतीय वस्तू अभिमानानं स्वीकारल्यानं आत्मनिर्भर भारताचा मार्ग अधिक प्रशस्त होत जाईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच मुंबईतल्या कृष्ण शेषाद्री यांच्याशी विशेष संवाद साधला. ऐतिहासिक माहिती रंजक पद्धतीनं मांडता यावी, तसंच त्यात सर्वसामान्यांचा सहभाग आणि योगदान लाभावं,

यासाठी कृष्ण शेषाद्री यांनी भारत राज्य हे संकेतस्थळ सुरु केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी या संवादात शेषाद्री यांच्या याच अभिवन प्रयत्नाबद्दल समजून घेतलं. प्रधानमंत्र्यांनी मन की बात मध्ये केलेल्या या उल्लेखाबद्दल आनंद वाटत असल्याची भावना कृष्ण शेषाद्री यांनी आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केली.

***होल्ड बाईट - कृष्ण शेषाद्री***

**<><><><><>**

भारत आणि उझबेकिस्ताननं परस्पर द्विपक्षीय संबंध सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीच्या पातळीवर नेण्याचा निर्णय घेतला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि उझबेकिस्तानचे अध्यक्ष शौकत मिर्झियोएव्ह यांच्यात आज ताश्कंदमध्ये झालेल्या शिष्टमंडळ स्तरीय चर्चेत हा निर्णय झाला. २०३० पर्यंत ५ अब्ज अमेरिकी डॉलर इतक्या वार्षिक व्यापाराचं उद्दिष्टही या बैठकीत निश्चित केलं गेलं. उझबेकिस्तानाकडून भारताला युरेनियमचा दीर्घकालीन पुरवठा करण्यासाठी एक आराखडा तयार करण्यावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली. यावेळी विविध क्षेत्रांशी संबंधित करारांवरही स्वाक्षरी झाली तसंच विविध क्षेत्रांमधलं सहकार्य अधिक दृढ करण्यावर सहमतीही व्यक्त केली गेली.

'विकसित भारत' आणि 'यांगी उझबेकिस्तान' या सामायिक विकासाच्या संकल्पांना पुढची दिशा देण्याच्या उपाययोजनांवर या चर्चेत भर दिला गेला. दोन्ही देशांमधल्या सहकार्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल प्रधानमंत्री मोदी यांना 'ओली दर्जाली दोस्तलिक' या उझबेकिस्तानच्या परदेशी नेत्यांसाठीच्या सर्वोच्च पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

किर्गिझस्तानमध्ये ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या 'शांघाय सहकार्य संघटने'च्या २६व्या शिखर परिषदेतही प्रधानमंत्री सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

राज्य सरकारने मराठा समाजाला सरसकट कुणबी म्हणून घोषित करावं, अशी मागणी मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी आज वार्ताहरांशी बोलताना केली. ही मागणी पूर्ण झाली नाही, तर मुंबईपर्यंत मोर्चा काढण्याचा आणि आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला. जरांगे यांनी आंतरवाली सराटी इथं पुन्हा सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाचा आज दुसरा दिवस आहे. मराठा समुदायाच्या मुख्य समितीची बैठक १२ सप्टेंबर रोजी आंतरवाली सराटी इथं होणार असून मुंबईत उपोषण करण्याबाबतचा निर्णय या बैठकीत

घेतला जाईल, तोपर्यंत सरकारनं आपल्या मागण्या मान्य कराव्यात, असं त्यांनी सांगितलं. जरांगे यांच्या समर्थनार्थ मराठा समाजाचे सदस्य मोठ्या प्रमाणात आंतरवाली सराटी इथं जमले आहेत.

दरम्यान, मराठा समाजाच्या प्रश्नांवर याआधीही मार्ग काढला होता, यातूनही मार्ग काढू, सरकारचे प्रतिनिधी जरांगे यांच्याशी चर्चा करतील, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात वार्ताहरांशी बोलताना केलं.

***होल्ड... बाईट- देवेंद्र फडणवीस***

**<><><><><>**

भारताच्या युवा शक्तीला योग्य दिशा देण्यासाठी योगाभ्यासाला शाळा-महाविद्यालयांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवणं आवश्यक आहे, असं प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज केलं. लोणावळा इथं कैवल्यधाम योग संस्थेत स्वामी कुवलयानंद यांच्या १४३व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. योग पर्यटन, प्रशिक्षण, संशोधन, डिजिटल व्यासपीठं, उपकरणं, वस्त्रं आणि विविध सेवांच्या माध्यमातून एमएसएमई, स्टार्टअप, महिला उद्योजक, कारागीर आणि स्थानिक समुदायांसाठी रोजगार आणि व्यवसायाच्या संधी निर्माण होऊ शकतात, असं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

नेपाळमध्ये आलेल्या महापुरामुळे काठमांडू इथं अडकलेले नागपूरचे १०२ यात्रेकरू आज सकाळी सुरक्षित राज्यात परतले. या महापुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या ७६८ वर पोहोचली असून जवळपास अडीच हजार जण अद्याप बेपत्ता आहेत. गेल्या दोन दिवसांत जवळपास ६०० भारतीय नागरिकांनी चीनमधून नेपाळमध्ये प्रवेश केला, तर ९०० भारतीय नागरिक चीनमध्ये सुरक्षित आहेत.

**//<><><><><>//**